मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मावळमधून श्रीरंग बारणे विजयी!

## विरोधी उमेदवाराला त्यांची जागा मावळच्या मतदारांनी दाखवून दिली : बारणेंचा वाघेरेंना टोला

**पिंपरी | प्रतिनिधी**

दहाव्या फेरीत श्रीरंग बारणे यांना 45 हजाराचे मताधिक्य मिळाले. हे लीड सहजासहजी तोडणे संजोग वाघेरे-पाटील यांच्यासाठी आता सोपे राहिलेले नाही. त्यामुळे मतदान केंद्रात येऊन खासदार बारणे यांनी विजयाचा गुलाल उधळला. दरम्यान, घासून नाही तर ठासून आल्याच्या घोषणा ही कार्यकर्त्यांनी दिल्या.



मतमोजणीच्या दहाव्या फेरीत बारणे यांनी सुमारे अर्धशतकाचे लीड मारले होते. त्यांना 2 लाख 99 हजार 961 येवढी मते मिळाली. तर, वाघेरे-पाटील हे 44 हजार 728 मातांनी पिछाडीवर पडले. बारणे यांनी प्रत्येक फेरीत लीड घेऊन वाघेरे-पाटील यांना चांगलेच मागे टाकले.

दहाव्या फेरीत मात्र बारणे यानी 45 हजाराचे लीड घेऊन विजयाच्या दिशेने आगेकूच केली. हे लीड तोडणे वाघेरे यांच्यासाठी आता अशक्यच मानावे लागणार आहे. त्यामुळे बारणे यांच्या कार्यकर्त्यांनी विजय आपलाच मानत गुलाल उधळला.

बारणे यांचा विजय समोर दिसताच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बालेवाडी मतमोजणी केंद्रातून काढता पाय घेतला. तर, बारणे समर्थक महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयाबाहेर जल्लोष करत विजयाची घोषणाबाजी केली. दरम्यान, अंतर्गत मतमोजणीचा अंदाज येताच बारणे खुद्द मतमोजणी केंद्रात दाखल झाले.

श्रीरंग बारणे म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघात लाखोंच्या फरकाने निवडून येणार हे आधीच सांगितलं होतं. माझ्यावर मतदारांनी विश्वास ठेवून कौल दिला आहे. महायुती आणि कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. पिंपरी- चिंचवड शहरातील जनतेने माझ्यावर विश्वास टाकला.

> “ मी एक लाखांच्या मातांनी निवडून येणार हे सुरुवातीपासून सांगतआलोय. अधिकृत आकडेवारी समोर आली नसली तरी मी समोरच्याला त्याची जागा दाखवून दिली आहे.
> - श्रीरंग बारणे, मावळ, खासदार

# शिरूर मतदारसंघात तुतारी वाजली!

## अमोल कोल्हेंनी अजितदादा गटाच्या शिवाजीराव आढळराव पाटलांना पराभवाची धूळ चारली

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक मतमोजणीतील शेवटच्या चरणातील मतमोजणीचा कल समोर आला. राज्यात आणि केंद्रात ‘इंडिया आघाडी’ची मुसंडी असून, तसेच चित्र शिरुर लोकसभा मतदार संघात आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांचा विजय निश्चित झाला आहे, तर महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या पराभवावर शिक्कामोर्तब झाले आहे.






ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवाजीराव आढळराव पाटील यांनी शिवसेना शिंदे गटातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) प्रवेश केला. राष्ट्रवादी आणि पवार कुटुंबियांचा कट्टर विरोधक म्हणून आढळराव पाटील यांची ओळख होती. किंबहुना, राष्ट्रवादीच्या विरोधातील मतदार आढळरावांच्या पाठिशी होता. मात्र, या निवडणुकीत तिकीटाच्या रस्सीखेचमध्ये आढळरावांना ‘घड्याळ’ हातावर बांधावे लागले.

मतदार संघातील खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरुर, हडपसर आणि भोसरी अशा सहापैकी ४ मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार असतानाही आढळराव यांना पिछाडीवर रहावे लागले आहे. डॉ. अमोल कोल्हे यांच्या विरोधात रान पेटवणारे राष्ट्रवादीचे दिग्गज आमदार दिलीप मोहिते यांना खेडमध्ये मताधिक्य देता आले नाही, अनेक वर्षे कॅबिनेट मंत्री राहिलेले दिलीप वळसे-पाटील आंबेगावमधून ‘सपशेल फेल’ ठरले आहेत. जुन्नरमधील आमदार अतूल बेनके, हडपसरचे आमदार चेतन तुपे यांना डॉ. कोल्हे यांचा वारु रोखता आला नाही.

### भोसरीत महेश लांडगेंची एकाकी झुंज

» भोसरी विधानसभा मतदार संघात आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून आढळराव पाटील यांच्या विजयासाठी भाजपाने एकाकी झुंज दिली. शेवटच्या सत्रातील मतमोजणीपर्यंत सुमारे १० हजार मतांचे मताधिक्य भोसरीतून आढळराव पाटील यांना मिळाले आहे, असे आकडेवारीतून दिसते. राष्ट्रवादी अजित पवार गटातील नाराजीची फटका महायुतीला बसला. अजित पवार गटातील मातब्बर नेत्यांनी ‘तुतारी’ चालवली. ‘माळी-मराठा’ असे कार्डही मोठ्या प्रमाणात चालले. विशेष म्हणजे, गेल्या दोन- अडीच वर्षांपासून महापालिका निवडणूक लांबणीवर पडल्यामुळे माजी नगरसेवक आणि इच्छुकांनीही या निवडणुकीत ‘तटस्थ’ राहण्याची भूमिका घेतली. भाजपा विरोधातील ‘ॲंटिइंकम्नन्सी’ आणि महायुतीमध्ये नाराजी यामुळे भोसरीत महेश लांडगे यांना एकाकीपणे खिंड लढवावी लागली.

# पुण्याच्या पैलवानानं मैदान मारलं!

## पुणे लोकसभेत भाजपच्या मुरलीधर मोहोळ यांची बाजी : कॉंग्रेसच्या रवींद्र धंगेकरांचा पराभव

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याचं लक्ष लागलेल्या पुणे लोकसभा मतदार संघात भाजपच्या मुरलीधर मोहोळांनी बाजी मारली आहे. 86, 369 मताधिक्यानं ते विजयी झाले आहे. 4,15,543 मतं मिळवून त्यांनी कॉंग्रेसच्या रवींद्र धंगेकरांना पराभूत केलं आहे. मुरलीधर मोहोळांना साधारण पर्वती, कोथरुड परिसरातून मोठं मताधिक्य मिळालं आहे. मुरलीधर मोहोळांची जादु चालली आहे. मोहोळांची जादु चालणार नाही, असं धंगेकर म्हणाले होते. मात्र अखेर मुरलीधर मोहोळांनी विजय खेचून आणला आहे.

वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट, कसबा पेठ या सहा मतदार संघापैकी कोथरुड, पर्वती, वडगाव शेरी, शिवाजीनगर हे भाजपचे मतदार संघ मानले जातात. त्यामुळे या मतदार संघातून मोहोळांना जास्त मतधिक्य मिळाल्याची शक्यता आहे. मात्र कॅन्टोन्मेंट आणि कसबा पेठ मतदारसंघातून त्यांना किती मताधिक्य मिळालं हे पाहावं लागणार आहे.



भाजपकडून मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी जाहीर करण्यापूर्वी भाजपच्या बऱ्याच नेत्यांची नावं चर्चेत होती. जगदीश मुळीक, सुनिल देवधरांचं नाव चर्चेत होतं. मात्र सुनिल देवधर यांनाच उमेदवारी मिळणार असं निश्चित होतं मात्र मुरलीधर मोहोळांना उमेदवारी देण्यात आली. मुरलीधर मोहोळांचे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी दांडगा संपर्क आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीं, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बानवकुळे आणि चंद्रकांत पाटील यांच्याशी दांडगा संपर्क आहे. त्यासोबतच कोव्हिड काळात ते महापौर होते आणि त्यावेळी त्यांनी पुण्यात चांगलं काम केलं होतं. त्यामुळे त्यांच्या नाव पुढे आलं आणि त्यांना शुअर सीट वाटत असल्याने भाजपने उमेदवारी दिली.

मोहोळ म्हणाले की, कॅन्टोन्मेंटमधून कमी मताधिक्य मिळाले, असे प्राथमिक दृष्ट्या दिसून येत आहे. परंतु, महायुतीतील सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र यांच्या पाठबळावर मी निवडून आलो. पुढील काळात रस्ते, विमानतळ आणि मेट्रो विस्तारीकरण, पीएमपीएल सक्षमीकरण आणि जाहीरनाम्यात दिलेले मुद्दे मार्गी लावणार. विशेषत दोन्ही कॅन्टोन्मेंट बोर्ड महापालिकेत समाविष्ट करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.

मी भाजप केंद्रीय सरचिटणीस पदावर असून, महाराष्ट्रातील भाजप, महायुतीबाबत लागलेल्या अनाकलनीय निकालाबाबत पक्षाचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे बोलतील, असेही त्यांनी नमूद केले.

### माझा विजय स्वर्गीय नेते गिरीश बापट यांना समर्पित

» माझा विजय स्वर्गीय नेते गिरीश बापट यांना समर्पित करतो. त्यांच्या निधनानंतर झालेल्या विधानसभा सभेच्या पोटनिवडणुकीत झालेल्या पराजयानंतर आमच्या हातून कसबा गेला असे, बोलले गेले परंतु या निवडणुकीत कसबा मतदारसंघातून मताधिक्य मिळवत कसब्यावर आमचे वर्चस्व सिद्ध केले आहे, अशी भावना पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली.

# बारामतीतून सुप्रिया सुळे विजयी

## उपमुख्यमंत्री अजित पवारांना बारामतीत मोठा धक्का : सुनेत्रा पवारांचा पराभव

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीतून सुनेत्रा पवार यांचा परभव करत सुप्रिया सुळे विजयी झाल्याने राष्ट्रवादी पक्षाचे नेते अजित पवार यांना राज्यात मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला महायुतीकडून चार जागा मिळाल्या होत्या, त्यापैकी केवळ रायगड या एका जागेवर सुनिल तटकरे हे विजयी झाले आहेत. इतर सर्वच जागांवर अजित पवार यांचे उमेदवार पराभूत झाले आहेत.

देशाचे लक्ष लागुन असलेला बारामती मतदारसंघात शरद पवार यांच्या मुलगी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार मैदानात होत्या. हा मतदारसंघ पवार कुटुंबाचा बालेकिल्ला मानला जातो. त्यामुळे बारामती लोकसभा मतदार संघात कोण जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या बारामती लोकसभेत सुप्रिया सुळे यांचा विजय झाला आहे. तर अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला आहे.



मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुप्रिया सुळे यांना एकुण ५ लाख ५९ हजार ६५४ मते मिळाले असून सुनेत्रा पवार यांना ४ लाख ५० हजार ५८२ मते मिळाली आहेत.

पवार कुटुंबामध्ये झालेल्या या लढतीकडे देशाचे लक्ष लागले होते. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे तर महायुतीकडून सुनेत्रा पवार निवडणूक रिंगणात होत्या. नणंद-भावजय यांच्या या लढतीत प्रचार दरम्यान अनेक आरोप-प्रत्यारोप झाले होते. बारामती लोकसभा मतदार संघासाठी 7 मे रोजी मतदान झाले होते.

बारामती लोकसभा मतदारसंघाकडे यंदा देशाचे लक्ष होते. आतापर्यंत बारामतीमध्ये पवार कुटुंबियांचे वर्चस्व राहिले आहे .शरद पवार बारामती लोकसभा मतदारसंघातून 6 वेळा खासदार झाले होते. त्यांची कन्या सुप्रिया सुळे या 3 वेळा खासदार झाल्या असून याही वेळी त्या बारामती लोकसभा मतदार संघातून एक लाखाहुन अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत.

### बारामतीतील विजयावर शरद पवारांनी पहिली प्रतिक्रिया

» शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया देताना म्हटलं की, आम्ही जनतेची कृतज्ञता व्यक्त करतो. आमचा प्रयत्न राहणार आहे की, देशात देखील चित्रं आशादायक आहे. उत्तर प्रदेशात देखील चांगला निकाल लागला आहे. यापूर्वी भाजपला जे यश मिळायचं त्यामध्ये मार्जिन मोठं असायचं. आता तसं चित्रं नाही. आम्ही सर्वांनी मिळून प्रयत्न केलं. मी मल्लिकार्जुन खरगे, सीताराम येचुरी यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. आज संध्याकाळी याबाबत निश्चित आम्हाला कळेल आणि त्यानंतर आम्ही दिल्लीला जाऊ, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# कडक बंदोबस्तामुळे मतमोजणी प्रक्रिया शांततेत

## पिंपरी-चिंचवड पोलिसांनी निवडणूक शांततेत व भयमुक्त पार पाडण्यासाठी कंबर कसली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होताच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ही निवडणूक शांततेत व भयमुक्त पार पाडण्यासाठी कंबर कसली. मोका, तडीपार, स्थानबद्ध यासह प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका सुरू केला. रूटमार्च, कोम्बिंग ऑपरेशन करून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या. सर्वत्र कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात होता. प्रत्येक हालचालींवर बारीक नजर होती. यामुळे मतदान व मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मावळ, शिरूर, बारामती व पुणे अशा चार लोकसभा मतदारसंघाचा भाग येतो. यामध्ये बारामती मतदार संघात सात मे रोजी तर तर मावळ, शिरूर व पुणे मतदार संघात १३ मे रोजी मतदान झाले. ही मतदान प्रक्रिया व मतमोजणी शांततेत पार पडण्यासाठी पोलिसांनी चोख नियोजन केले होते. आयुक्तालयातील मनुष्यबळासह बाहेरूनही अतिरिक्त बंदोबस्त मागविण्यात आला होता. यामध्ये केंद्रीय सशस्त्र दलाच्या तुकड्यांचाही समावेश होता. पोलिस आयुक्तांनी संवेदनशील मतदान केंद्रांना भेट देत आढावा घेतला. अठरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पथसंचलन करण्यात आले. यामध्ये वरिष्ठ अधिकारीही सहभागी झाले होते. जास्त मतदार संख्या असलेली मतदान केंद्रे, यापूर्वी काही अनुचित प्रकार घडलेली केंद्रे यावर पोलिसांचे अधिक लक्ष होते. रेकॉर्डवरील गुन्हेगारांची धरपकड करण्यासह प्रतिबंधात्मक कारवाई केली. ठिकठिकाणी नाकाबंदी लावून वाहनांची तपासणी केली जात होती. गस्तही वाढविण्यात आली होती. शहरातही कडेकोट बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. मतदान केंद्राला पोलिस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. मतदान प्रतिनिधींना मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल, डिजिटल वॉच, कॅलक्युलेटर, पेजर, टॅब, डिजिटल गॅझेट्स, इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास



### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे बारीक लक्ष

» पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांचे सर्व हालचालींवर बारीक लक्ष होते. पोलिस उपायुक्त, सहायक आयुक्त, वरिष्ठ निरीक्षक यांच्या वेळोवेळी बैठक घेत योग्य त्या सूचना दिल्या जात होत्या. प्रतिबंधात्मक कारवाई, बंदोबस्त याचा आढावा घेतला जात होता. यासह मतदान केंद्रासह मतमोजणी केंद्र व संवेदनशील ठिकाणी भेट देत आयुक्तांनी आढावा घेतला.

### बालेवाडी-म्हाळुंगेत ठिकाणी छावणीचे स्वरूप

» मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडावी, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी बालेवाडी-म्हाळुंगे येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल मतमोजणी केंद्रावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली होती. निवडणूक विभागाच्या पासशिवाय कोणालाही आत प्रवेश दिला जात नव्हता. मुख्य प्रवेशद्वारापासूनच तपासणी करून सोडले जात होते. सर्वत्र बॅरिकेड्स उभारले होते. शहरातही कडेकोट बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. मतदान केंद्राला पोलिस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. मतदान प्रतिनिधींना मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल, डिजिटल वॉच, कॅलक्युलेटर, पेजर, टॅब, डिजिटल गॅझेट्स, इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास बंदी केली होती.

### असा तैनात होता पोलिस बंदोबस्त

» पोलिस उपायुक्त : २ सहायक पोलिस आयुक्त : ५
पोलिस निरीक्षक : १३ सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक : ३४
अंमलदार : २५० आरसीपी : २ तुकड्या

# सर्व शाळा डिजिटल होणार; 50 मॉडेल शाळांचे उद्दिष्ट

## पालकांचा इंग्रजी शाळांकडे कल वाढल्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील पटसंख्या कमी

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शालेय पोषण आहारा बरोबरच मिष्ठान्नाने स्वागत, प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तक संचाचे वाटप, भौतिक सुविधा व गुणवत्ता विषयक उपक्रमांद्वारे ५० मॉडेल शाळा तयार करणे, आणखी नवीन ५० शाळांना आयएसओ मानांकन मिळवून देणे आणि सर्व शाळा डिजीटल करण्यासारखे विविध उपक्रम व कार्यक्रम शिक्षण विभागाने हाती घेतले आहेत.

येत्या १५ जूनपासून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. मावळ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २७२ शाळा असून त्यात इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे सुमारे १८ हजार ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांतून सुमारे आठशे शिक्षक कार्यरत आहेत. गेल्या काही वर्षांत पालकांचा इंग्रजी शाळांकडे कल वाढल्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील पटसंख्या कमी होत आहे. खासगी शाळांच्या स्पर्धेत मराठी शाळा टिकविण्यासाठी तसेच मराठी शाळांमधील गुणवत्ता वाढवून पालकांना या शाळांकडे आकृष्ट करण्यासाठी नवीन शैक्षणिक वर्षात विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्याच अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी अनोखे स्वागत करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराबरोबरच गोड खाद्यपदार्थ (मिष्ठान्न) देण्यात येणार आहे. गेल्या काही वर्षात सामाजिक संस्थांच्या सहकार्याने तालुक्यातील अनेक शाळांमध्ये भौतिक सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. गुणवत्ता वाढीसाठीही अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.



### येत्या वर्षात 100 पेक्षा जास्त शाळा आयएसओ

» प्रत्येक शाळेने वर्षभरात राबविलेल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची नोंद ठेवून त्यांचे पीपीटी सादरीकरण केले जाणार आहे. तालुक्यातील पन्नास शाळांमध्ये विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून तसेच गुणवत्ता वाढीचे उपक्रम राबवून त्या मॉडेल स्कूल म्हणून तयार करण्यात येणार आहेत. सध्या तालुक्यातील ५० शाळा आयएसओ मानांकन प्राप्त आहेत. येत्या शैक्षणिक वर्षात शंभरपेक्षा जास्त शाळा आयएसओ करण्याचे ध्येय शिक्षण विभागाने ठेवले आहे.

### पहिल्याच दिवशी मिळणार पुस्तके

» पहिल्याच दिवशी सर्व शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तक संचाचे वाटप.पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश. मागणीनुसार १ लाख ४० हजार २९५ पुस्तके प्राप्त.मंगळवार (ता.४) पासून ७ जूनपर्यंत पुस्तक संच शाळांना वितरित होणार

# ससूनमधील डॉक्टरला पैसे पोहोचविणारे अटकेत

## कल्याणीनगर अपघात प्रकरण : रक्तनमुन्यात बदल करण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन आरोपीच्या रक्तनमुन्यात बदल केल्याप्रकरणी गुन्हे शाखेने मंगळवारी दोघांना अटक केली. बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालने आरोपींच्या मार्फत ससूनमधील डॉक्टरला या दोघांनी पैसे पोहोचविल्याचे समोर आले आहे. अश्फाक बाशा इनामदार (वय ३६, रा. धानोरी, विश्रांतवाडी), अमर संतोष गायकवाड (वय २७, रा. सुभाषनगर, नवी खडकी, येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अल्पवयीन मुलाच्या रक्तनमुन्यातील बदल केल्याप्रकरणी यापूर्वी ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागातील डॉ. अजय तावरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांना अटक केली होती. मुलाच्या रक्तनमुन्यात बदल करण्यासाठी अगरवालने डॉ. तावरे यांना पैसे दिले होते.



### गुन्ह्यात 10 जणांना अटक

» विशाल अग्रवाल (वय 50), सुरेंद्रकुमार अग्रवाल, शिवानी अग्रवाल, कोसी पबचे मालक नमन प्रल्हाद भुतडा(वय 25), मॅनेजर सचिन अशोक काटकर (वय 35), ब्लॅक पबचे मालक संदीप रमेश सांगले (वय 35),कर्मचारी नितेश धनेश शेवानी (वय 34) आणि मॅनेजर जयेश सतीश गावकर (वय 23), ससून हॉस्पिटलचे डॉ. अजय तावरे , डॉ श्रीहरी हळनोर, वॉर्डबॉय अतुल घटकांबळे यांना पोलिसांनी अटक केलेली आहे.

अगरवालने डॉ. तावरे यांना कोणामार्फत पैसे दिले, याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू होता. तपासात अगरवालने अश्फाक आणि अमर यांच्याशी संपर्क साधून डॉ. तावरे यांना पैसे दिल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पसार झालेल्या अश्फाक आणि अमर यांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. पोलिसांनी दोघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना १० जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे.

कल्याणीनगर भागात १९ मे रोजी अपघात घडला होता. भरधाव मोटारीच्या धडकेत संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी विशाल अगरवालच्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले होते. मुलाने मद्यप्राशन केल्याची माहिती चौकशीत मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याला ससून रुग्णालयात आणले. ससूनमधील डॉ. तावरे यांच्याशी अगरवालने संपर्क साधला. मुलाच्या रक्तनमुन्यात बदल करण्यासाठी त्याने डॉ. तावरे यांना पैसे दिले होते. मुलाला वाचविण्यासाठी त्याची आई शिवानी अगरवालने रक्त दिल्याचे तपासात उघड झाले. त्यानंतर याप्रकरणी शिवानी अगरवालसह पती विशालला अटक करण्यात आली.

पुण्यातील कल्याणी नगरमध्ये रविवारी (दि.19 मे) मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात आयटी अभियंता असलेले अनिश अवधिया (वय-27) आणि अश्विनी कोष्टा यांचा जागीच मृत्यू झाला होता.अपघाताच्या वेळी आरोपी अल्पवयीन मुलागा त्याच्या ताब्यातील पोर्शे कार ताशी 160 किमीच्या वेगात चालवतअसल्याचे तपासात समोर आले आहे.

### गाडीतील सीसीटीव्ही तपासले

» पोर्शे गाडीमध्ये लावण्यात आलेला सीसीटीव्ही कॅमेरा देखील तपासण्यात आला. काही दिवसांपूर्वी कंपनीच्या प्रतिनिधींनी येरवडा पोलीस ठाण्यात जाऊन गाडीची तपासणी केली होती. गाडीमध्ये तांत्रिक बिघाड असल्याची तक्रार अल्पवयीन तरुणाच्या कुटुंबीयांनी केली होती. ही गाडी ऑटोमॅटीक आहे. तपासणीनंतर आम्ही याबाबत माहिती देऊ शकू, असे कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले होते.

# उजनीतील शंख शिंपल्यांची पर्यटकांसह लहान मुलांना भुरळ

## नदी पात्रातील अनेक वर्षांनंतर पहिल्यांदा शंख शिंपले, ऐतिहासिक वास्तूंचे दर्शन

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वाधिक जास्त पाणीसाठा असलेल्या मात्र सध्या दुष्काळाच्या झळा सहन करत असलेले उजनी धरणातील पाणीसाठा इतिहासात दुसऱ्यांदा सर्वांत कमी झाला आहे. त्यामुळे या उजनी नदी पात्रातील मौल्यवान शंख, शिंपले नदीपात्राच्या कडेला आले आहेत.

या शंख, शिंपलेची भुरळ सर्वसामान्यसह पर्यटकांना पडू लागली असून नदीपात्राबाहेर आलेले शंख शिंपले वेचण्यासाठी लहान मुले सरसवल्याचे चित्र सध्या उजनीच्या नदीपात्रात दिसून येत आहे.

उजनीचे पाणी उजनीच्या इतिहासात दुसऱ्यांदा एवढे कमी झाले आहे. त्यामुळे उजनी पत्रात जलसमाधी मिळालेल्या वास्तू पण्याबाहेर आल्या आहेत. त्या पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांना सोबतच पर्यटक येत आहेत. या पाण्याचे बाहेर आलेले शंख शिंपले हे लहान मुलांचे आकर्षण झाले आहे.



तर कधीकाळी आपल्या पूर्वजांचे गाव या पाण्यात गेल्याच्या कथा ऐकणाऱ्या नवीन पिढीला त्या गावाच्या पाऊलखुणा दिसू लागल्या आहेत. उन्हाळा सुट्टीवर आलेले शहरवासीय गावकरी आल्या लहानग्यांना गावाच्या खुणा दाखवताना भूतकाळात गेल्याचे दिसत आहे.

एकीकडे उन्हाची तीव्रता वाढत आहे तर दुसरीकडे झपाट्याने पाणी पातळी कमी होत आहे. परिणामी पाणी मूळ नदीपात्रात पोचले असल्याने, उरलेल्या डोहात हजारोंच्या संख्येने जलचर मृत्युमुखी पडत आहेत. जलचरांच्या जिवावर अवलंबून असलेल्या पक्ष्यांची डोहालगत भक्ष मिळविण्यासाठीची धडपड सुरू असल्याचे दिसून येत आहे.

अन्नसाखळीतील शंख-शिंपले हे एक महत्त्वाचा घटक आहे. यावर अनेक पक्षांचे अस्तित्व अवलंबून असते. उघड्या चोचीचा करकोचा या पक्षाचे शंख-शिंपले हे आवडीचे खाद्य आहे. उजनीत येणाऱ्या या पक्षांची संख्या मोठी असते. याशिवाय खेकडे, मोठे मासे यांसारख्या जलचरांचे खाद्यान्न शंख-शिंपले आहे. यामुळे अन्नसाखळीत या शंख-शिंपल्यांना महत्त्व आहे. हरित लवादाच्या नियमाप्रमाणे धरणात पाणी साठा राखीव ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा अन्नसाखळीला बाधा पोचू शकते.

पातळी कमी झाल्याने मासे मिळण्याचे प्रमाण घटले आहे. माशांनी धरणाकडे धाव घेतल्याने आता पूर्वीसारखे मासे मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे. परिणामी ज्यांची केवळ मासेमारीवर उपजीविका अवलंबून आहे, त्यांना आर्थिक चणचण जाणवत आहे.

### वैभव, संस्कृतीचे दर्शन

» एकीकडे उजनीच्या पाण्याखाली गेले हा शेतकऱ्यांसाठी जरी मोठाप्रश्न असला तरी या उजनीतील उघड्या झालेल्या वास्तू आजही त्या गावचे वैभव आणि संस्कृतीचे दर्शन घडवत आहे.